दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २१३ वा गुरूवार दि.२५ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# ९० टक्के शिक्षक सर्वेक्षणाच्या कामात

लातूर : प्रतिनिधी-मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटूंबांचे सर्वेक्षणा बरोबरच एसस्सी, एसटी, ओबीसी समाजाचेही सर्वेक्षण सुरु झाले. शाळा सुरू ठेवून शिक्षक आदलून बदलून सर्व्हेक्षणाचे काम करत आहेत. सदर सर्व्हेक्षणाच्या कामात शाळेतील ९० टक्के शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षक ज्ञानदानाच्या बरोबरच मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटूंबांचे सर्वेक्षण करताना त्यांची तारेवरची कसरत होताना दिसून येत आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शासकीय पातळीवर गतीमान निर्णय घेतले जात आहेत. त्याचाच भाग म्हणचे लातूर जिल्हयातील १ हजार २७५ जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांवर मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटूंबांचे व इतर कुटूंबांचे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी दिली आहे. शिक्षकांना शाळा सुरू ठेवून मराठा व खुल्या प्रवर्गातील व इतर प्रवर्गातील कुटूंबांचे सर्वेक्षण करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक शाळा सांभाळत असून एक शिक्षक कुटूंबांचे सर्वेक्षण करत आहे. सदर शाळेतील शिक्षक हे आलटून-पालटून काम करताना दिसून येत आहेत.

शाळा सुरू ठेवून शिक्षकांचे सर्वेक्षण

लातूर तालुक्यातील १६४ जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक शाळा सुरू ठेवून सर्वेक्षणाचे काम करत आहेत. दररोज या सर्वेक्षणाच्या कामावर ९० टक्के उपस्थित राहत आहेत. तर उर्वरीत शाळेत अध्यापनाचे काम करत आहेत. शिक्षकांना शाळा सुरू ठेवून आपल्या गावात सर्वेसाठी आलटून पालटून जाण्याच्या सुचना दिल्या असल्याची माहिती लातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले यांनी दिली.शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करून शाळा सुरूच लातूर जिल्हयातील शिक्षकांना कुटूंबांचे सर्वेक्षण करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार कांही शिक्षक शाळेवर थांबून आध्यापन करत आहेत. तर कांही शिक्षक मराठा व खुल्या प्रवर्गातील व इतर प्रवर्गातील कुटूंबांचे सर्वेक्षण करत आहेत. पर्यायी व्यवस्था करून शिक्षक शाळा सुरू ठेवण्याच्या बरोबरच सर्वेक्षणाचेही काम करत आहेत. प्रसंगी एक शिक्षक शाळा असेल तर शेजारच्या शाळेतील शिक्षकांना बोलून परस्पराच्या सहकार्यातून सध्या काम सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदाना फूटाणे यांनी दिली.

# इंडिया आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये नाराजी ?



नवी दिल्ली : इंडिया आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये नाराजी दिसून येत आहे. प्रथम, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये त्यांचा पक्ष आगामी लोकसभा निवडणूक एकट्याने लढवू शकतो, असे म्हटले. यानंतर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. आम आदमी पार्टी, टीएमसी हे आघाडीचे भाग आहेत. पण आप पंजाबमध्ये एकट्याने लोकसभा निवडणूक लढवणार असे सांगितले. यानंतर अनेक चर्चांना उधाण आले आहे.ममता म्हणाल्या की, सध्या राहुल गांधींची यात्रा सुरु आहे. यात्रा बंगालमध्ये सुद्धा येणार आहे, पण आम्ही बंगालमध्ये येत आहोत, याची कल्पना अद्याप त्यांनी आम्हाला दिली नाही. आम्ही सुद्धा इंडिया आघाडीत आहोत. पश्चिम बंगालबाबत माझ्याशी कोणतीही चर्चा झालेली नाही. इतर राज्यात काय करणार याचा विचार आम्ही नंतर करू, पण आम्ही धर्मनिरपेक्ष पक्ष आहोत आणि बंगालमध्ये भाजपचा सामना आम्ही एकट्याने करू शकतो, असे त्या म्हणाल्या. याबाबत काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, ममता बॅनर्जी म्हणाल्या की, आम्हाला भाजपचा पराभव करायचा आहे. भाजपला पराभूत करण्यासाठी कोणतेही पाऊल मागे घेणार नाही. त्याच भावनेने आम्ही पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करत आहोत.

वाटेत स्पीड ब्रेकर येतात जयराम रमेश म्हणाले की, तुम्ही लांबचा प्रवास करत असताना कधी वाटेत स्पीड ब्रेकर येतात, कधी लाल दिवे येतात. आम्ही स्पीड ब्रेकर ओलांडतो. याचा अर्थ आपण प्रवासातून मागे हटावे असा नाही. आम्ही स्पीड ब्रेकर ओलांडतो. लाल दिवा हिरवा होण्याची वाट पाहतो, इंडिया आघाडीत सर्व काही सुरळीत असल्याचे त्यांनी सांगितले.

# मनोज जरांगे यांना मुंबई हायकोर्टात हजर राहण्याचे निर्देश




मुंबई : मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांच्या अंतरवाली सराटी गावाहून मुंबईच्या दिशेने पायी निघाले आहेत. त्यांच्यासोबत हजारो मराठा कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले आहेत. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली. न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्यासमोर या याचिकेवर सुनावणी पार पडली. राज्याचे महाधिवक्ता डॉ. रवींद्र सराफ देखील न्यायालयात उपस्थित होते. गाड्या, बैलगाड्यांसह अनेक मराठे नागरिक हे मुंबईच्या दिशेने येत आहेत. मनोज जरांगे यांच्या या आंदोलनामुळे मुंबईत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या मोर्चाला प्रतिबंध घालण्यात यावा, सरकारने या मोर्चावर कडक कारवाई करावी, अशी मागणी वकील गुणरत्न सदावर्ते यांनी केली.मनोज जरांगे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी सदावर्ते यांची प्रमुख मागणी आहे. मनोज जरांगे यांना परवानगी दिली तर आपण कोर्टात त्या परवानगीला चॅलेंज देऊ, असे सदावर्ते म्हणाले आहेत. तर दुसरीकडे आतापर्यंत तरी मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाला आझाद मैदानासह कुठेही पोलिसांकडून परवानगी देण्यात आलेली नाही. आझाद मैदानावर आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह ओबीसी नेत्यांनी अर्ज केला आहे. पण पोलिसांनी कोणतीही भूमिका घेतलेली नाही. अशाप्रकारे जमाव एकवटून एकत्र येत आहे, त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. या प्रकरणी कलम ३०२ म्हणजे खुनासारख्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर अंतरवाली सराटीत लाठीचार्ज दरम्यान २९ पोलिस जखमी झाले होते. त्याचा दाखला सदावर्ते यांच्याकडून कोर्टात देण्यात आला. यावेळी कोर्टाच्या वकिलांनी महत्त्वाचे निर्देश दिले.यावेळी न्यायाधीशांनी गुणरत्न सदावर्ते आणि महाधिवक्ता रवींद्र सराफ यांचा युक्तिवाद ऐकून घेत असताना महत्त्वाचे निर्देश दिले. 'सरकारने रोड ब्लॉक होणार नाही याची खबरदारी घ्यावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बिघडणार नाही याची जबाबदारी घ्यावी', असे निर्देश हायकोर्टाने सरकारला दिले. मनोज जरांगेंना उच्च न्यायालयात हजर होण्याबाबत नोटीस बजावा. आझाद मैदान पोलिसांनी जरांगे यांना नोटीस बजावावी. आझाद मैदानात ५ हजारपेक्षा जास्त लोक येऊ शकत नाहीत हे देखील कळवण्यात यावे, असे आदेश कोर्टाने दिले.कोर्टात नेमका युक्तिवाद काय?सदावर्ते कोर्टात म्हणाले, मनोज जरांगेंच्या आंदोलनाला कुठलीही परवानगी नसताना हे सर्व सुरू आहे. गाड्या, ट्रॅक्टर, बैलगाड्यांसह लाखोंच्या संख्येने लोक मुंबईत येत आहेत. जर परवानगी दिली तरी आम्ही त्याला चॅलेंज करू.

# चाकरमान्यांचा विश्वास व ग्रामस्थाची खंबीर साथ मतदार संघाच्या विकासासाठी मला प्रेरणादायी ठरतेय - आ. शेखर निकम






मुंबई/ प्रतिनीधी: चिपळूण संगमेश्वर मतदार संघातील सर्व जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकर चाकरमान्यांचे मेळावे मुंबईत होत आहेत. आतापर्यंत झालेले ओझरे खुर्द, कडवई, मुचरी, धामापूर जिल्हापरिषद गट हे मेळावे अलोट गर्दीने पार पडले त्याप्रमाणे कोसुंब व कसबा परिषद या गटातील मुंबईतील ग्रामस्थांचा मेळावा दादर येथे महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट, श्रीकृष्ण मंदिर सभागृहात आमदार निकम यांच्या उपस्थितीत त्याच अलोट गर्दीने पार पडला.

आमदार निकम यांनी मतदार संघात करोडो रुपयांचा निधी मंजूर करुन आणत रस्ते, पाणी, तसेच इतर विकासात्मक कामाचा गावागावात विकास केला आहे. रखडलेले विविध प्रकल्प आणि पर्यटनदृष्टया विकासाच्या योजना यामुळे मतदारसंघात आकार घेऊ लागल्या आणि यातूनच गावात झालेली विकासकामे आणि मुंबईकर चाकरमान्यांच्या अपेक्षा यादृष्टीने आमदार निकम यांनी जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकरांचा मेळावे आयोजित करुन आढावा घेतला व चाकरमान्यांचा विश्वास संपादन केला.

जनतेला आपलं सुख-दु:ख जाणून घेणारा हक्काचा माणूस आमदार शेखर निकम यांच्या स्वरुपात लाभला. लोकांच्या मनात असलेले आमदार शेखर निकम यांचे विषयीचे प्रेम या अलोट गर्दीने जाणवले. सर्व जनतेच्या मनात व डोळ्यात याबाबतचा वेगळाच आनंद व समाधान दिसत होते. ही गर्दी आमदार शेखर निकम यांचा शांत, संयमी स्वाभाव व लोकांची निकड, रोजगार निर्मिती लक्षात घेऊन त्यांना अनुसरुन एक विकास कामे करण्याची सर्वांपेक्षा वेगळी कार्यपद्धती यामुळे व त्यांच्यावर असलेल्या जनतेचे प्रेम याचे प्रात्यक्षिक आहे.

आमदार शेखर निकम यांनी मेळाव्यात मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्या सर्वाच्या आशिर्वादाने आमदार झालो अन कोरोना, महापुर यामुळे विकास कामे करताना खुप अडचणी आल्या झालेल्या सत्तांतरे यामुळेसुद्धा काम करताना खूप अडचणी येत होत्या. त्यातूनच जमतील तशी व लोकांची निकड लक्षात घेऊन विकास कामे केली. हे करत असताना आपल्याशी भेटी गाठी सुद्धा झाल्या मात्र एकत्रीत असा भेटण्याचा अन आपल्याशी विकास कामांबाबत चर्चा करण्याचा योग येत नव्हता तो कसा येईल तर तो योग मेळाव्यांचे आयोजनाद्वारे आला. मेळाव्यातील आपली उपस्थिती व आपले प्रेम अनुभले. कोणत्याही आमदारास जेवढे प्रेम मिळत नसेल तेवढे प्रेम मला आपणाकडून लाभले यांचे मला समाधान वाटले. कोसुंब व कसबा जिल्हा परिषद गटांना ९० करोडोंचा निधी मिळाला आणि जो मतदार संघाचा विकास झाला तो फक्त माझ्यामुळे झाला नसून मा. उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या सहकार्यातून झाला आहे आणि म्हणूनच अजितदादा यांना आपण सर्वानीच कायम साथ देणे क्रमप्राप्त आहे. काही लोक म्हणतात की, यांनी निष्ठा सोडली, यांच्या डोक्यात हवा गेली, तस काही नसून हा घेतलेला निर्णय माझ्या स्वार्थासाठी नसून जनतेच्या अन मतदार संघाच्या विकासाठी आहे हे तुम्ही सर्व जाणताच. जि.प. गटासाठी कोट्यावधी पेक्षा जास्त निधी खर्च करणे विकासाच्या दृष्टीने ही गोष्ट सर्व जनतेसाठी भाग्याची आहे. आमदार शेखर निकम हे एकमेव असे आमदार आहेत राजकारणात नम्र असून, मृदूभाषी आहेत प्रत्येकाला आपलंस वाटणारे नेतृत्व आहे. मा. आजिदादा यांचे त्यांच्याशी जवळचे नाते असून ते त्यांचे आवडते आमदार आहेत. मतदार संघाचा विकास करावयाचा असेल तर अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करत त्यांना साथ देणे गरजेचे आहे. आमदार निकम हे राजकारण विरहीत समाजकारण करणारे व सर्वसामान्यांमध्ये रमणारे व्यक्तिमत्व आहे. निस्वार्थी स्वभावाने त्यांनी आजपर्यंत कधीही न होणारा वाडी-वस्त्यांचा विकास केला आहे. विधानभवनात जनतेचा आवाज बनून त्यांनी मतदार संघातील व कोकणातील अनेक प्रश्नांवर आवाज उठवून जनतेला न्याय मिळवून दिला आहे. यामुळे प्रत्येक माणसाच्या हृदयात त्यांनी वेगळे स्थान निर्माण केले आहे. २०२४ च्या निवडणूकीत आमदार शेखर निकम सर यांना प्रचंड बहुमताने निवडूण देण्याचा जि.प. गट कोसुंब व कसबा मुंबईस्थित चाकरमान्यांनी निर्धार करत आमदार शेखर निकम यांना कायम खंबीरपणे साथ देऊ असा सर्वांनी विश्वासाने शब्द दिला. मेळाव्या दरम्यान सदर पदाधिका-यांस नियुक्त पत्रे देण्यात आली यामध्ये वहाब अयुब दळवी (अल्पसंख्यांक, जिल्हा सेक्रेटरी व मिडीया प्रमुख), सबिहा शकिल नेवरेकर (कार्यकारीणी सदस्य महिला संगमेश्वर तालुका), अकबर काका दसुरकर (कार्यकारणी सदस्य), फैरोजा मोडक (कार्यकारणी सदस्य संगमेश्वर संघटक), मजिद नेवरेकर (रत्नागिरी उपाध्यक्ष), अमित जाधव (तालुका उपाध्यक्ष), पप्पु गोवळकर (संगमेश्वर तालुका ओबीसी सेल अध्यक्ष), प्रतिक जाधव (युवक अध्यक्ष कोसुंब जि.प.गट) यांचा समावेश आहे. या कार्यक्रमादरम्यान १० जानेवारी २०२४ रोजी मुंबईत विरार जीवदानी क्रॉस रोड शंकर नगर येथे राहणारे सुजित राजाराम गिते यांच्या खोलीला रेफ्रिजरेटर कॉम्परेसर स्पोट ने आग लागली व त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यास आमदार शेखर निकम यांच्या माध्यमातून अर्थिक स्वरुपात सहकार्य करण्यात आले व त्यास आधार देण्यात आला.

यावेळी समिर भुजबळ (माजी खासदार तथा मुंबई प्रदेशाध्यक्ष), प्रमोद अप्पा पाटील (प्रवक्ते व सरचिटणीस रा. काँ. पार्टी), किरण बरगे (वडाळा तालुकाध्यक्ष), वर्षाताई महाडीक (महिला वडाळा तालुकाध्यक्षा), शशिकांत कांबळे (अध्यक्ष वार्ड क्र. २०० नायगाव, वडाळा), शाहिदभाई सय्यद (अध्यक्ष वार्ड क्र. २०१ नायगाव, वडाळा), पुजाताई निकम (प्रदेश महिला उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), राजेंद्र पोमेंडकर (संगमेश्वर तालुकाध्यक्ष), सुरेश घडशी (मंबई संपर्क प्रमुख मुंबई संगमेश्वर तालुका), रमेश राणे (विधानसभा क्षेत्राध्यक्ष चिपळूण संगमेश्वर मतदारसंघ), राजेंद्र सुर्वे (जिल्हा बँक संचालक, जेष्ठ नेते), जाकिर शेकासन (जिल्हाध्यक्ष रत्नागिरी जिल्हा अल्पसंख्याक) बाळुशेठ ढवळे (प्रमुख संघटक चिपळूण संगमेश्वर मतदार संघ)पंकज पुसाळकर (युवक तालुकाध्यक्ष), मजिदभाई नेवरेकर (जिल्हा उपाध्यक्ष), अनिरुध्द निकम,शैलेश चव्हाण,मुंबईस्थित मान्यवर दिलीप कडू (वाशी तर्फे देवरुख), प्रकाश रावणंग, वैभव शितप (कर्ली), भाऊ घाणेकर (देवघर), रामचंद्र झेपले (पुर), अशोक जाधव (अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, देवरुख निवे), प्रकाश आगरे, शांताराम रांबाडे (वायंगणे), गजानन पानगले, जयंत म्हादे (पांगरी), सिताराम दळवी (घोडवली), संजय शेलार (सांगवे), विजय पाष्टे (देवधामापुर), संदिप कारकर (आंबवली मराठवाडी), किरण रायणाक (फणसट), प्रभाकर कुळे (ताम्हाणे), अमोल बडद, प्रविण बडद (उजगाव), प्रशांत जाधव, उदय पवार (कोसुंब), दिलीप देवळे, समीर जाधव (करंबेळे तर्फे संगमेश्वर), दत्ताराम सावंत (शिवणे), चंद्रकांत गोवळकर, सुनिल कांबळे (नांदळज), गोपाळ मनवे (असुर्डे), नरेश खानविलकर (भिरकोंड), उदय गमरे, प्रदिप करदोडे (जांभूळवाडी), शिवाजी चांदे, हर्षद चांदे (कसबा), सुरेश गुरव, रत्नाकर गराटे, गणपत गराडे (फणसवणे), आनंद सोलकर, सुरेश सनगरे, संतोष महाडीक, राजाराम सोलकर (कळंबस्ते), सुर्यकांत बाईत, प्रमोद बसवणकर, (उंबरे), शांताराम माईन, उदय मालप (अंत्रवली), उमेश कदम (भिमनगर), जनार्दन झगडे, अशोक मानकर (आंबवली), संतोष बकावे (कसबा), यशवंत तावडे (कळंबस्ते), संदेश झिमण, कॅप्टन हनिफ मोडक, कॅप्टन उपाध्ये इ. पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच प्रफुल्ल बाईत, आप्पा बेर्डे, सिताराम आगरे, राजू जाधव, प्रशांत शिंदे, पप्पू गोवळकर, प्रतिक जाधव, अमित जाधव, अमोल जाधव, तुषार पवार, अमित जाधव, प्रदिप रावणंग, नारायण घाणेकर, प्रदिप कातकर, प्रशांत कांबळे, महेंद्र पानगले, श्रीराम शिंदे, मजिदभाई नेवरेकर, खालिद काझी, नासिर खलपे, अकबर काका दसुरकर, संकेत गुरव, भाई पेढारी, महेंद्र मनवे, पंकज मोरे,अमोल गुरव, गोपाळ मनवे, सबिया नेवरेकर, उदय गमरे, लियाकत नेवरेकर,गौरव सुर्वे,तुषार बिजितकर इ. पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मेहनतीने मेळावा यशस्वीरीत्या पार पडला.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पथसंचलनः एक राष्ट्रप्रेमाची अनुभूती

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे वेध सर्वांनाच लागले आहे. हा एक राष्ट्रीय सण आणि आनंदोत्सव म्हणूनही साजरा केला जातो. या दिवसाचे प्रमुख आकर्षण म्हणजे दिल्ली येथील जवानांचे पथसंचलन. त्याबाबत

जगातील सर्वात मोठी लिखित घटना स्वीकारून २६ जानेवारी १९५० पासून आपले प्रजासत्ताक राष्ट्र झाले. प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने नवी दिल्ली येथील कर्तव्यपथावर (राजपथ) दरवर्षी संचलन केले जाते. भारतीय लष्कराची ताकद, जवानांची हिंमत आणि भारताच्या एकात्मकतेचे यथार्थ दर्शन संपूर्ण जगाला या निमित्ताने घडविले जाते. हे संचलन पाहण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. तसेच आपल्या देशातर्फे एखाद्या परदेशी पाहुण्यासही विशेष निमंत्रण देऊन आमंत्रित केले जाते आणि त्यांच्यासमोर दिमाखाने आणि भव्य दिव्य संचलन केले जाते. या वर्षी प्रधानमंत्री महोदयांच्या विशेष निमंत्रणाने फ्रान्सचे राष्ट्रध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन हे विशेष अतिथी आहेत. तर या संचलनाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे या वर्षी संचलनात केवळ महिला शक्तीच सहभागी होणार आहेत.सुरुवातीच्या काळात इर्विन स्टेडियम म्हणजे मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदान येथे या कवायती होत असत. त्यानंतर राजपथावर संचलन सुरू झाले. १९५५ पासून या प्रजासत्ताक दिवस परेडला सुरुवात झाली. भारतीय लष्कराचे आर्मी, नेव्ही व वायुदल यांच्या विविध रेजिमेंट्सचे जवान, पोलीस दल, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, स्काऊट गाइडचे विद्यार्थी तसेच सुमधुर असे विविध बॅन्ड पथक यांचे पथक संचलन करतात. तसेच राष्ट्रपतींचे घोडस्वार सुरक्षा पथक, उंटस्वाराचे पथक देखील यात असते. राष्ट्रपती भवन ते इंडिया गेट अमर जवान ज्योतीपर्यंत असलेल्या या राजपथाच्या दोन्ही बाजूने प्रेक्षकांसाठी जागा असते.विविध राज्यातील संस्कृतीचे वैशिष्ट्य दर्शविणारे चित्ररथ समग्र भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवितात. तसेच निर्भय मिसाइल, अश्विन रडार सिस्टिम देखील या संचलनात असतात. वायुदलाच्या आकर्षक व चित्तथरारक कवायती होतात. मोटार सायकल स्वार जवान कसरती करतात. २१ तोफांच्या सलामीसह राष्ट्रगीत सादर केले जाते. सेनादलाची सर्वोच्च पदक देऊन वीरांचा, शहिदांच्या कुटुंबाचा सन्मानाही केला जातो. हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी होते. एकूणच संपूर्ण वातावरण शीतलहरीपेक्षा देशभक्तीच्या धुक्याने आच्छादलेले असते.संचलन सुरू झाल्यावर अत्यंत स्फूर्तिदायी असे वातावरण असते. अत्यंत शिस्तीत एक एक पथक पुढे येते आणि मुख्य मंचकासमोर आपल्या राष्ट्रपतींना तथा सेना दलाच्या सर्वोच्च कमांडरला व अतिथींना सलामी देत पुढे जाते. आपला तिरंगा राष्ट्रध्वज आपल्या दोन्ही बाजूस डौलाने फडकत असतो. अगदी आसमंत देखील या ध्वजलहरीने स्तंभित होतो. नजरेच्या टप्प्यात जिकडे तिकडे तिरंगा, हजारो तिरंगा ध्वज हे दृश्य पाहून आपले नेत्र सुखाने दिपून जातात आणि आपण या तिरंग्या राष्ट्रध्वजास सलामी देतो. सळसळणारा तिरंगा ध्वज, देशभक्तीपर गीते असे मंत्रमुग्ध वातावरण असते. श्वासाश्वासातून उसळणारा राष्ट्रप्रेमाचा ध्यास त्यावेळी आपल्या हृदयाची स्पंदने होतात आणि मन तिरंग्या सोबतच लहरते, हिंदोळा घेते. ही राष्ट्रभक्तीची अतिउच्चतम अनुभूती प्रजासत्ताकदिन परेडच्या वेळी संचलन करणार्या प्रत्येकाची अन् ती पाहणार्या करोडो भारतीयांची होते.संरक्षण दलात सेवा करताना ही संधी मिळू शकते. पण विद्यार्थी असताना ही संधी मिळणे हे भाग्यच असते. आपला देश आपल्यासाठी काय करतो? असा प्रश्न विचारण्यापेक्षा, आपण देशासाठी काय करू शकतो? असा प्रश्न युवा वर्गाला विचारला पाहिजे आणि त्याचे उत्तर संरक्षण दलातील या युवा वर्गाकडे पाहिले की मिळते. निश्चितच अभिमान आणि राष्ट्रभक्ती याचे मूर्तिमंत प्रतीक असलेले हे प्रजासत्ताक दिन संचलन आहे. जवळपास २५ दिवस या संचलनाची तयारी करून घेतली जाते. विविध दलांचे कॅम्प सुरू होतात. या परेडसाठी ज्यांची निवड होते ते खरोखरच भाग्यवान असतात, कारण कठोर परिश्रमाने विविध कसोट्या पार करत या जागी पोहोचलेले असतात.

यातील प्रत्येकाच्या मनात, आयुष्यात एकदा तरी प्रजासत्ताक दिन परेडची संधी मिळावी हीच भावना असते किंबहुना त्याचे ते स्वप्नही असते आणि या स्वप्नपूर्तीसाठी कित्येक दिवस, वर्ष मेहनत घेतात आणि त्यांच्या या स्वप्नपूर्तीचा हा क्षण येतो. मी याचा प्रत्यक्ष अनुभव १९९१ या वर्षी घेतला असल्याने स्वानुभवाने सांगू शकतो की कर्तव्यपथावरील प्रजासत्ताक दिन संचलन म्हणजे राष्ट्रभक्ती, शक्तीची उच्चतम अनुभूती आहे.राष्ट्रीय एकात्मता २६ जानेवारी १९९१ च्या प्रजासत्ताक परेडमध्ये सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या म्हणजे एन.एस.एस.च्या पथकामार्फत महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून मी सहभागी होतो. राज्याच्या विविध विद्यापीठांमधून एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी अशी निवड त्यावेळी केली होती. देशातील विविध विद्यापीठाचे एन.एस.एस.चे प्रतिनिधी या कॅम्पमध्ये होते. आमच्या निवास तंबूमध्ये एकाच राज्याचे विद्यार्थी न ठेवता सरमिसळ करून बारा-बारा विद्यार्थ्यांच्या समुहाला एकत्र ठेवले होते आणि यातूनच राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक भक्कम झाली.तो तंबू म्हणजे एक घर आणि त्यातील आम्ही विद्यार्थी म्हणजे एक कुटुंब असाच संदेश सर्वच कॅम्पमधून दिला जातो. आपल्या राज्यातही प्रजासत्ताक दिन परेड होते. मुंबईत शिवाजी पार्क, दादर येथे याचे आयोजन केले जाते. अगदी दिल्लीच्या संचलनाच्या धर्तीवर येथील आयोजन असते. राज्यपाल महोदयांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण होऊन संचलन सुरू होते. या संचलनात देखील संरक्षण दल, पोलीस, होमगार्ड, विद्यार्थी यांच्यासह विविध विभागांची पथक आणि चित्ररथ सामील असतात. ही राष्ट्रप्रेमाची अनुभूती घेऊया.

# त्यांनी रणजी खेळायलाच हवी...

त्या दिवशी चॅनेल सर्फिंग करत असताना अचानक रोहित शर्मा दिसला. दूरचित्रवाणीच्या पडद्यावर लाइव्हचं चिन्ह दिसलं... अरे हा कोणता सामना?त्या दिवशी चॅनेल सर्फिंग करत असताना अचानक रोहित शर्मा दिसला. दूरचित्रवाणीच्या पडद्यावर लाइव्हचं चिन्ह दिसलं... अरे हा कोणता सामना? भारतीय संघाची कोणती मॅच सुरू आहे? शोध घेतला तर भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध मालिका खेळतोय याचा उलगडा झाला... एका क्रिकेट चाहत्यानं गप्पांच्या ओघात व्यक्त केलेली ही प्रतिक्रिया..खरं सांगू का, विश्वकरंडकाचा तो अंतिम सामना गमावल्यानंतर सध्या तरी क्रिकेट पाहण्यात रसच उरलेला नाही. आफ्रिकेविरुद्ध खेळा की अफगाणिस्तानविरुद्ध खेळा... जिंकलात तरी त्याला काय अर्थ... बुंद से गई वो हौदसे आनेवाली नही हैं !... हा संवाद काल्पनिक वाटला तरी सत्य आहे. विश्वकरंडक मिळो की न मिळो आपला संघ वर्षभर क्रिकेट खेळत राहिला पाहिजे, असं बीसीसीआयचं नियोजनच असतं. कधीच काही नसेल तर अफगाणिस्तानविरुद्धची मालिकाही चालेल. याच अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची मालिका खेळून बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट संघानं काय साधलं, हा प्रश्न अनेकांना पडणं स्वाभाविक आहे. काय तर टी-२० स्पर्धेच्या विश्वकरंडकाच्या मालिकेच्या तयारीसाठी ही मालिका.हा विश्वकरंडक जून महिन्यात होणार आहे आणि या मालिकेमुळं चार महिने आधी खरोखरच संघाची तयारी आणि सराव होणार आहे? बरं ही मालिका कधी तर काही दिवसांत इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळायची असताना झाली. कोठे टी-२० आणि कोठे कसोटी!असो, विश्वकरंडक गमावून दोन महिने झाले तरी अजूनही त्याचं शल्य कुणीही विसरलेला नाही. आफ्रिका, अफगाणिस्तानविरुद्ध जिंकाल पण दुधाची तहान ताकावर मानायला अजूनही सच्चा भारतीय क्रिकेटप्रेमी तयार नाही हे तेवढंच सत्य आहे.प्रायोजक, ब्रॉडकास्टर आणि प्रसारक यांच्याबरोबर केलेल्या कोट्यवधींच्या करारामुळं मैदानात उतरावंच लागलं, तसंच आपल्याशी जवळीक असलेल्या क्रिकेट बोर्डालाही मालिका खेळून थोडेसे पैसे मिळवून देण्याचं बीसीसाआयला औदार्य दाखवावं लागतं पण मायबाप प्रेक्षकांच्या लेखी नोंद नसावा इतकाही क्रिकेटचा भडिमार नसावा.रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचं व्हाइटबॉल म्हणजेच मर्यादित षटकांच्या प्रकारातील भवितव्य काय ? असं आता वारंवार चर्चिलं जात आहे. जून महिन्यात होत असलेल्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत हे दोघं खेळणार की नाही, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न भारतीय क्रिकेटला पडलाय. आपल्याला खेळायचंय हे जणू काही दाखवून देण्यासाठी रोहित आणि विराटनं अफगाणिस्तानविरुद्धच्या केवळ तीन सामन्यांच्या मालिकेत खेळण्याचा निर्णय घेतला.प्रत्येक जण आपल्या सोईनुसार कसा बदलत असतो हे पाहू या. गेल्या महिन्यातील आफ्रिका दौऱ्यात दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेअगोदर झालेल्या मर्यादित षटकांच्या मालिकांतून रोहित-विराट यांनी विश्रांती घेतली कारण पुढची कसोटी मालिका प्रतिष्ठेची आणि महत्त्वाची होती.एरवी अशी मोठी कसोटी मालिका असते, तेव्हा प्रमुख खेळाडू त्याकडं अधिक लक्ष देतात आणि व्हाइटबॉल क्रिकेट मालिकांतून विश्रांती घेतात, परंतु मायदेशात होत असलेली इंग्लंडविरुद्धची कसोटी मालिका जिंकण्याची प्रतिष्ठा महत्त्वाची असताना रोहित-विराट आणि अफगाणिस्ताविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळून काय साधले ? केवळ टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी आपली उपलब्धता दाखवून दिली?वास्तविक या दोघांनी एक तरी रणजी क्रिकेट सामना या कालावधीत खेळायला हवा होता. खेळाडू मोठा झाला की तो देशांतर्गत स्पर्धांसाठी उपलब्ध नसतो किंवा वेळ मिळत असला तरी तो खेळण्यात उत्सुक नसतो. अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा आता मुख्य संघातून बाहेर गेल्यामुळं त्यांच्याकडे रणजी क्रिकेट हाच



पर्याय उरला आहे.अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेतून वगळलेला श्रेयस अय्यर लगेचच रणजी खेळण्यासाठी मुंबई संघाकरिता उपलब्ध झाला. दिग्गज खेळाडू रणजी स्पर्धेत खेळत नाही अशी ओरड केली जाते, या वेळी ती सुवर्ण संधी होती. रोहित आणि विराट शेवटचा रणजी सामना कधी खेळला हे त्यांनाही आठवणार नाही. थोडा विचार करा. हे दोघेही गेल्या सात दिवसांत अफगाणविरुद्धची मालिका खेळण्याऐवजी एकेक रणजी सामना खेळले असते, तर रणजी स्पर्धेची चर्चा झाली असती.त्यांच्या संघातील उपस्थितीमुळं नवोदितांना अनुभवाचे बोल मिळाले असते आणि स्फूर्तीही मिळाली असती. या सर्व महान खेळाडूंचा आदर्श सचिन तेंडुलकरला संधी मिळाली की तो रणजीत खेळायचा. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याअगोदर तो सामना खेळून रणजी क्रिकेटमधून निवृत्त झाला होता.हिस्सार येथे मुंबई-हरियाना सामन्यात सचिन खेळला. हरियाना संघातून अजय जडेजाही त्या सामन्यात खेळला होता. महान खेळाडू सुनील गावसकर परदेश दौऱ्यावरून पहाटे मुंबईत दाखल व्हायचे आणि दोन-तीन तासांत शिवाजी पार्क, दडकर अशा मैदानांत अनेकदा क्लब क्रिकेटचे सामने खेळायला हजर असायचे.दिग्गज खेळाडूंची इच्छा असो वा नसो, जर दुखापती नसतील तर मोसमात एक तरी रणजी सामना खेळायला त्यांना बीसीसीआयनं भाग पाडायला हवं. पूर्वापार चालत आलेली भारतीय क्रिकेटची रचना भरभक्कम असल्यामुळं नवी पिढी तयार होत आहेच पण त्यांना समृद्ध करणं आयपीएलमधून नव्हे तर देशांतर्गत स्पर्धात दिग्गजांनी खेळण्यातून घडू शकतं. हे सत्य कोणीही नाकारणार नाही.

# इंडिया अर्थात भारत.....

ज्यांनी संपूर्ण देशभर भारत जोडो नावाची पदयात्रा काढली त्यांनाच आज भारत या नावाचा तिरस्कार वाटायला लागतो तर ज्यांनी स्किल इंडिया मेक इन इंडिया सारखे उपक्रम देशभर राबवले त्यांनीच भारत या नावाचा अट्टाहास निवडणुका तोंडावर आल्या असताना का धरावा ५ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती भवनातून ॠ२० च्या पाहुण्यांसाठी एक निमंत्रण पत्रिका निघाली आणि त्यात द प्रेसिडेंट ऑफ भारत अस लिहिलं होतं तेव्हा विरोधी पक्षाकडून एकच खळबळ उडाली की सरकार आता देशाचं नाव देखील बदलत आहे भारतीय संविधान कलम एक मध्ये इंडिया अर्थात भारत हे राज्यांचा संघ असेल असं सांगतं म्हणजे इंडिया किंवा भारत हे दोन्ही नाव आपण कायदेशीर रित्या वापरू शकतो म्हणजे द प्रेसिडेंट ऑफ इंडिया ऐवजी द प्रेसिडेंट ऑफ भारत असं वापरलं असेल तर त्यात गैर काय दोन्ही शब्दांचा कायदेशीर दर्जा अर्थ एकच आहे परंतु तेव्हापासून देशात दोन संघ निर्माण झाले एक इंडिया समर्थक आणि दुसरा भारत समर्थक परंतु या विषयाचे मंथन करत असताना इंडिया नावाची पार्श्वभूमी देखील लक्षात घेणे गरजेच आहे भारत नावाचे संदर्भ आपल्याला विष्णुपुराण, महाभारत, भागवत, आणि ऋग्वेद या प्राचीन ग्रंथात देखील आढळतात साम्राज्य चक्रवर्ती भरत नावाचे राजे होऊन गेले त्यांनी जिंकलेल्या भूभागाला राजाच्या नावावरून भरत राज्य, भरत वर्ष असं नाव पडल्याची आख्यायिका देखील आपल्याला सांगितले जाते आणि त्यावरूनच भारत असं झालं या भूप्रदेशाची सर्वात जुनी आणि मोठी नदी असलेली सिंधू नदी आहे सिंधू नदीला ग्रीक लोक त्यांच्या ग्रीक भाषेत इंडस म्हणायचे आणि त्यानंतर जेवढे ही परकीय आक्रमणे या देशावर झाली त्यांना भारत उच्चाराला अवघड वाटत होतं नंतर त्यांना कळलं की ग्रीक लोक यांना इंडस म्हणतात त्यांना ते सोपं वाटू लागलं आणि मग ते पुढे इंडस चा अपभ्रंश होऊन इंडिया असे उच्चारू लागले आणि इंडिया ही नवी ओळख या देशाची ठरली आपल्या देशाचं नाव लिहील असताना आपण मराठी किंवा हिंदी भाषेत भारत असं लिहितो तर इंग्रजीमध्ये लिहिताना इंडिया असं लिहितो भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवात देखील मराठीत आम्ही भारताचे लोक अशी आहे तर हिंदीत हम भारत के लोक अशी आहे आणि इंग्रजीमध्ये वि द पीपल ऑफ इंडिया अशी आहे भारत हा एकटा देश नाहीये की ज्याला दोन नाव आहेत आपण चायना नावाच्या देशाला चायना या इंग्रजी शब्दाने ओळखतो तर चिनी लोक चिनी भाषेत आपल्या देशाला चौंघुओ असं उच्चारतात तर जपानला जापनीज भाषेत निपो असं उच्चारतात. चीन जपान अमेरिका बांगलादेश अशा कितीतरी देशांची नावे आपल्याला सांगता येतील ज्यांना इंग्लिश मध्ये एक वेगळा शब्द आहे तर स्थानिक भाषेत वेगळा शब्द आहे देशाच्या स्थानिक भाषेवरून संस्कृति, परंपरा भौगोलिक इतिहास यावरून देशाचे नाव बदलत असतात किंवा त्यावरून पडलेले आपल्याला पाहायला मिळतात . ८ सप्टेंबर २०२२ रोजी नरेंद्र मोदी यांनी विष्णुपुराणाला समोर ठेवत भारत शब्दावर आपले विचार मांडले होते तर १५ ऑगस्ट २०२२ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मोदी यांनी पाच प्रत घेतले होते त्यात दुसराच प्रण असा होता की कोलो नाईकल हिस्ट्रीला मिटवणे त्याच्या दुसऱ्याच महिन्यात सरकारने राजपतचे कर्तव्य पद असे नामकरण केले आणि त्याच वर्षी इंडियन नेव्ही च्या ध्वजावरील सेंड जॉर्ज क्रॉस हटवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेचा अष्टकोनाचा आकार देत महाराजांना कायम स्मरणात ठेवत त्यांना मानवंदना दिली तसेच इंडिया गेट जवळ असलेल्या किंग जॉर्ज फाईव्ह ला हटवत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्मारकाची उभारणी केली गेली तर बिटिंग द रिट्रीट सिरेमनी मध्ये इंग्रजीची हिम अबाइट बाय मिला काढून आता लता मंगेशकर यांच्या ए मेरे वतन के लोगो या गीताचा समावेश करण्यात आला सरकारने २०१४ पासून आतापर्यंत १५०० ब्रिटिश नियमांना मोडीत काढत नवा इतिहास रचला आहे आणि कोलो नाईकल हिस्टरीला संपुष्टात आणले आहे त्यात अयोध्येतील राम मंदिराचा देखील समावेश करता येईल इलाहाबादचं नाव प्रयागराज करण्यासाठी ३०० कोटी रुपयांचा खर्च योगी सरकारला आला होता तर देशाचे नाव बदलण्यासाठी साधारणतः १४००० कोटी रुपयांचा खर्च येण्याचा अंदाज अर्थतज्ज्ञांचा आहे मला वाटतं एवढा खर्च करून देशाचं नाव बदलण्यापेक्षा देशाला महासत्ता लवकर कसं बनवता यावर विचार करण गरजेच आहे उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन डिगऱ्या पास करून सुद्धा सरकारी नोकरी मिळत नाही आणि खाजगी मध्ये चांगल्या दर्जाचे काम मिळत नाही म्हणून १३ डिसेंबर २०२३ रोजी दोन तरुणांनी हल्लाबोल केला तर एक तरुणी आणि एक तरुण बाहेर बसून घोषणाबाजी करत होते भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांच्या विचारांनी प्रेरित असलेले हे चार तरुण संसद भवनामध्ये तरुणांच्या बेरोजगारीवर एकही शब्द बोलला जात नाही म्हणून हल्लाबोल करतात ही आक्रमक पाऊल उचलतात मला वाटतं सरकारने देशाच नाव बदलण्यावर चर्चा करण्यापेक्षा तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार कसा उपलब्ध करून देता येईल यावर विचार करणे गरजेच आहे


*****************

लेखक
कृष्णा राऊत शेंद्रेकर
मो.८४८५०१८२७३
खर्पीर=र्झीीहपूरीर्रीं८९

# वेडा पिंजारी

गोव्यामधल्या भेटीगाठी झाल्यावर मी निघालो. वाटेत मडगावला कुल्फी खाण्यासाठी रस्त्यावर रांगच रांग लागली होती. माझा सारथी गणेश मला म्हणाला, ‘साहेब, ही फार लोकप्रिय कुल्फी आहे.’

गोव्यामधल्या भेटीगाठी झाल्यावर मी निघालो. वाटेत मडगावला कुल्फी खाण्यासाठी रस्त्यावर रांगच रांग लागली होती. माझा सारथी गणेश मला म्हणाला, ‘साहेब, ही फार लोकप्रिय कुल्फी आहे.’ मी खाली उतरलो. त्या कुल्फीवाल्याच्या रांगेमध्ये मीही सहभागी झालो. पाठीवर थैली, डोक्यावर टोपी, अंगात मळकट असलेले कपडे घालून एक माणूस मला कुल्फी द्या, असा आग्रह त्या कुल्फीवाल्याकडं धरत होता. दुरून पाहता क्षणी असं वाटलं, की हा कोणीतरी वेडा माणूस फुकट कुल्फी मागत असेल, असा त्याचा अवतार होता. कुल्फी घेण्यासाठी जेव्हा माझा नंबर आला, तेव्हा मी त्या माणसालाही एक कुल्फी द्या, मी त्याचे पैसे देतो, अशी विनंती कुल्फीवाल्याला केली. कुल्फीवाला म्हणाला, ‘अहो दादा, हा ‘वेडा पिंजारी’ आहे. याचा रोजचाच त्रास आहे. चार पैसे कुणी तरी त्याला दिले, की लगेच घेऊन येतो अन् कुल्फी मागतो. त्याला दिवसाकाठी मीही अशीच एक-दोन वेळा कुल्फी देत असतो.बिचारा पिंजारी...! मला रात्री कुल्फीचा गाडा ढकलण्यासाठी बिचारा मदत करतो.’ त्या वेड्याला घेऊन तो कुल्फीवाला सहजपणे बोलून गेला. कुल्फीवाल्यानं मला आणि त्या माणसाला दोघांनाही कुल्फी दिली. तो माणूस कुल्फी खाण्यामध्ये मग्न होता.त्या माणसाच्या डोळ्यांमधली आग, त्याची लांब लांब बोटे आणि झुपकेदार केस पाहून हा माणूस भूतकाळानं खूप पछाडलेला असावा, असा मी अनुमान काढत होतो. मी कुल्फी खाता खाता सहज त्या कुल्फीवाल्याला विचारले. ‘कोण आहे हा वेडा



पिंजारी आणि रोज इथंच का येतो.’ कुल्फी विकणारे दोघे जण होते, ते एकमेकांकडं पाहत होते.कुल्फीवाला मला म्हणाला, ‘साहेब ‘तो’ राहतो स्मशानभूमीमध्येच, तिथंच झोपतो.’ मी पुन्हा कुल्फीवाल्याकडं गेलो आणि माझ्यासाठी आणि त्या माणसासाठी अजून एक-एक कुल्फी घेतली. कुल्फीवाला म्हणाला, ‘आता ही शेवटची कुल्फी आहे बरं का.’ पिंजारीला म्हणालो, ‘तुमचं नाव पिंजारी आहे का आडनाव, तो हसला आणि म्हणाला, ‘माझं नावच पिंजारी आहे.’ त्यानं दोन मिनिटांत कुल्फी खाल्ली. तो आता निघण्याच्या तयारीमध्ये होता.मी त्याला म्हटलो, ‘कुठं राहता, तुम्ही मूळचे गोव्याचे का?’ तो गंभीर झाला आणि माझ्याकडं एकटक पाहत होता. तो म्हणाला, ‘इथंच राहतो, पुढच्या स्मशानभूमीत.’ मला काही कळेना, मी पुन्हा त्याला म्हणालो, ‘तिथं कुणी नातेवाईक काम करतात का?’ तो म्हणाला, ‘नाही.’ ‘तो’ स्मशानभूमीकडं निघाला. मीही त्याच्या मागं निघालो.स्मशानाच्या गेटमधून आत जाताना त्यानं मागं वळून पाहिलं. मी त्याला दिसलो, पण न थांबता तो तसाच निघून गेला. त्या गेटवर एक महिला झाडू मारत होती. मी त्या महिलेजवळ जाऊन थांबलो. ती महिला घाम पुसत होती. मी तिला म्हणालो, ‘तो आत गेलेला वेडा इथंच राहतो काय?’ त्या महिलेनं माझ्याकडं रागानं पाहिलं आणि मला म्हणाली, ‘कोण म्हणतं तो वेडा आहे म्हणून.इथं स्मशानभूमीत राहायला मिळावं म्हणून त्यानं वेड्याचं सोंग घेतलंय.’ मी म्हणालो, ‘तसं का?’ ती बाई म्हणाली, ‘ती फार मोठी कहाणी आहे.’ मी म्हणालो, ‘असं काय झालं मला सांगा ना...!’ ती सांगायला तयार नव्हती. खोदून खोदून विचारल्यावर तिनं माझ्याशी बोलायला सुरुवात केली.पिंजारी दायमा मूळचा महाराष्ट्रातील नगरचा, नोकरीच्या निमित्तानं तो गोव्याला आला. काबाडकष्ट करून पिंजारीनं एक छोटं घर घेतलं. तो ज्या छोट्या कंपनीत काम करायचा, तिथं त्याचं विजया या मुलीवर प्रेम बसलं. घरच्यांचा विरोध पत्करून विजयासोबत पिंजारीनं लग्न केलं. दीड वर्ष त्यांचा संसार खूप सुखात चालला.

दीड वर्षांनी विजयानं कॅसिनोमध्ये जॉब सुरू केला. एक दिवस पिंजारी घरी आला, पण विजया घरी नव्हती. पिंजारीनं तिच्या जॉबच्या, नातेवाईक अशा सर्व ठिकाणी विजयाची विचारपूस केली, पण तिचा पत्ता लागेना. शेवटी पिंजारीनं पोलिसात तक्रार दिली. चार दिवसांनी पिंजारीला अजून एक धक्का बसला.

# सहजयोग विषयावर व्याख्यान संपन्न



मुरुड/महेंद्र आल्टे : शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४ रोजी 'संभाजी महाविद्यालयात परमपूज्य.श्री निर्मला देवी प्रणित सहजयोग या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम (पाटील) विराजमान होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. कोकरे (कृषी सेवा केंद्र श्रीरामपूर) यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. प्रल्हाद आव्हाड (पद्मश्री विखे पाटील कॉलेज प्रवरानगर) उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक वक्त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सहज योगाचा प्रसार जगातील १८० देशांमध्ये झालेला आहे हे नमूद केले. ही ध्यान पद्धती सर्व वयोगट, जाती, पंथ, धर्मातील मानवासाठी असल्याचे सांगून यामुळे निरोगी जीवन जगता येते, बौद्धिक व शारीरिक आजारापासून मुक्ती मिळवता येते, मानसिक ताण तणाव, निद्रानाश, भ्रम यासारखे आजार बरे होण्यास मदत होते. तर हृदयविकार, मधुमेह ,रक्तदाब ,वात विकार, कॅन्सर यासारख्या जटील रोगावर नियंत्रण मिळवता येते, व्यसनांचा परित्याग केला जातो. आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन कौटुंबिक ,सामाजिक स्वास्थ्य प्राप्त होऊन शांती ,समाधान ,आनंद प्राप्त होऊन स्मरणशक्तीतील एकाग्रता प्राप्त झाल्यामुळे अभ्यासात प्रगती होते. सहजयोग ही एक आत्मज्ञानाची शास्त्रोक्त पद्धत असून यामध्ये अंधश्रद्धेला वाव नाही. यामध्ये साधकास निर्विचार अवस्था प्राप्त होऊन परमेश्वराच्या चराचरातील अस्तित्वाची जाणीव होते. आत्मज्ञान होते .आत्मसाक्षात्कार प्राप्त केला जातो. कुंडलिनी जागृती व आत्मसाक्षात्कारासाठीचे छोटेसे प्रात्यक्षिक ही करून घेण्यात आले. प्राचार्य महोदयांनी विद्यार्थ्यांना अभ्यासातील प्रगतीसाठी मनाच्या एकाग्रतेसाठी सहजयोग ध्यानाचा दैनंदिन जीवनामध्ये सराव करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी महालक्ष्मी निसर्गोपचार व आयुर्वेद केंद्राच्या संचालिका डॉ. धावारे मॅडम उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे क्रीडा संचालक, प्रो. मधुकर क्षीरसागर यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक, विद्यार्थी बंधू-भगिनी उपस्थित होते.

# रताळे, पपई, संत्री आणि गाजर यांच्यात काय साम्य आहे, जो त्यांना सुपरफूड बनवतो? तज्ज्ञांकडून जाणून घ्या उत्तर




प्रत्येक ऋतुनुसार बाजारामध्ये विविध रंगाच्या भाज्या आणि फळे उपलब्ध होतात. तुम्हाला तुमच्या आहारात व्हिटॅमिन्स आणि अँटिऑक्सिडंट्स हवे असतील तर केशरी रंगाची फळे आणि भाज्या निवडा, असे अपोलो हॉस्पिटलच्या मुख्य पोषणतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी सुचवले आहे. आज आपण नारंगी किंवा केसरी रंगाच्या फळे आणि भाज्यांबाबत जाणून घेऊ या, जे हिवाळा या ऋतुमधील सर्वात सहज उपलब्ध होणारे सुपरफूड मानले जाते.व्हिटॅमिन सी :केसरी फळे आणि भाज्यांमध्ये उच्च व्हिटॅमिन सी असते, जे आपल्याला लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. जेव्हा आपण सर्दी आणि फ्ल्यूचा संसर्ग होणाऱ्या ऋतूंचा सामना करत असतो, तेव्हा आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. संत्री, आंबा, पिवळी आणि लाल शिमला मिरची हे यासाठी उत्तम पर्याय आहे. याशिवाय ते कोलेजन तयार करण्यात मदत करतात, जे त्वचेच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. काही फळे आणि भाज्यांमध्ये चमकदार केशरी रंगाची छटा असते, जी त्यात उच्च बीटा-कॅरोटीन असल्याचे दर्शवते, जे 'व्हिटॅमिन ए'चा एक चांगला स्त्रोत मानले जाते. हे पोषक तत्व चांगली दृष्टी, रोगप्रतिकारक कार्य आणि त्वचेचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. रताळे, गाजर हे बीटा-कॅरोटीनचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत, जे विविध प्रकारचा स्वादही देतात.फ्री रॅडिकल्सला तटस्थ करण्यासाठी अँटिऑक्सिडंट्स आवश्यक आहेत. फ्री रॅडिकल्समुळे पेशींचे नुकसान(लशश्रश्रीश्री वरार) होऊ शकते आणि दीर्घकाळ टिकणारे आजार (लहीपळल वळीशरीश) होऊ शकतात. कॅरोटीनोइड्स (उरींशपेळवी), एक प्रकारचा शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट, सामान्यतः केशरी रंगाच्या भाज्यांमध्ये आढळतो. जर्दाळू, पपईचे सेवन केल्याने तुमच्या शरीराला ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यासाठी मदत करते आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी आवश्यक असलेले घटक यात मिळतात. डोळ्याच्या मॅक्युलामधील (चरर्लीश्रर) कॅरोटीनोइड्स (रेटिनाच्या मध्यभागी) निळा प्रकाश ९० टक्क्यांपर्यंत कमी करू शकतात. प्रोस्टेट आणि फुफ्फुसाच्या कर्करोगात त्यांची प्रतिबंधक भूमिका अभ्यासात आढळून आली आहे.निरोगी हृदयासाठी फायदेशीर : लिंबूवर्गीय फळे, विशेषतः, हृदयाच्या आरोग्याशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, संत्री आणि द्राक्ष फळांमध्ये फायबर, पोटॅशियम आणि अँटिऑक्सिडंट असतात, जे रक्तदाब कमी करण्यास आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करतात.पाण्याची कमतरता भरून काढते आणि पोषण देते :अनेक केशरी रंगाची फळे शरीरातील पाण्याचे प्रमाण वाढवतात, ज्यामुळे पाण्याची कमतरता होत नाही आणि तृप्त झाल्याची भावनाही मिळते.वर्षाच्या इतर कोणत्याही वेळी तुम्हाला निवडण्यासाठी इतकी केशरी रंगाची फळे आणि भाज्या सापडणार नाहीत. संत्री, लिंबूवर्गीय फळांसह दिवसाची सुरुवात केल्यास तुम्हाला ताजेतवाने असल्यासारखे वाटते. गाजर कच्चे असो किंवा शिजवलेले ते तुमचा नाश्ता पौष्टिक बनवतात. भाजलेले किंवा स्मॅश केलेले रताळे जेवणात समाविष्ट केल्यास आरामदायी भावना निर्माण करते. आंबादेखील आरोग्यासाठी उत्तम पर्याय आहे. पपईच्या रसाळ गोड चवीचा आनंद घेऊ शकतात किंवा फळांच्या सॅलडमध्येदेखील खाऊ शकता.

# राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त विशेष मतदार नोंदणी मोहीम

लातूर, दि. २४ (जिमाका): भारत निवडणूक आयोगाने २५ जानेवारी रोजी १४ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, मतदारसंघनिहाय व मतदान केंद्र स्तरावर साजरा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर मतदारसंघामधील नामांकित १६ महाविद्यालयांमध्ये १८ ते १९ वयोगटातील युवकांची मतदार नोंदणी करण्यासाठी २४ व २५ जानेवारी रोजी विशेष मतदार नोंदणी शिबीर राबविण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी कळविले आहे.

लोकशाही सक्षमीकरणाची पहिली पायरी मतदार नोंदणी आहे. निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, शुध्दीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. मतदार नोंदीमध्ये युवा वर्गाची मतदार नोंदणी होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून लातूर शहर मतदारसंघामध्ये यापूर्वी अनेकवेळा मतदार नोंदणी शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. १४ व्या राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लातूर शहरातील दयानंद (सर्व शाखा) महाविद्यालय, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राजर्षी शाहू महाविद्यालय, श्रीमती सुशिला देवी महाविद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, कॉकसीट महाविद्यालय, एम.आय.टी. महाविद्यालय, अभिनव महाविद्यालय एम.एस. बिडवे महाविद्यालय आदी महाविद्यालयांमध्ये १८ ते १९ वयोगटातील युवा विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्यासाठी २४ व २५ जानेवारी रोजी विशेष मतदार नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीरामध्ये १८ ते १९ वयोगटातील युवा मतदारांनी फॉर्म ६ भरुन मतदार नोंदणी करावयाची आहे. या शिबिराचा महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील सर्व १८ ते १९ वयोगटातील मतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा लातूर शहर मतदारसंघ-२३५ चे मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

# स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने जिल्हा प्रशासन

लातूर, दि. २४(जिमाका) : लातूर जिल्हा प्रशासन विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने लातूर जिल्हा शाश्वत विकास प्रकल्प राबविणार आहे. या अंतर्गत लातूर जिल्ह्यात पर्यावरण संवर्धन, अपारंपारिक ऊर्जा, जलसंधारण व जलपुर्नःभरण, नैसर्गिक शेती, पशुसंवर्धन, लघुउद्योग व कुटरउद्योग, घनकचरा व्यवस्थापन व महिला आरोग्य व सक्षमीकरण या क्षेत्रातील शासकीय योजना राबविण्यात येणार आहेत. हा प्रकल्प प्रभावी व कार्यक्षमरित्या राबवून लातूर जिल्ह्याचा विकास पॅटर्न तयार करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, व्यक्ती यांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे. लातूर जिल्ह्यात या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, व्यक्ती यांनी या प्रकल्पात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. स्वयंसेवी संस्था, व्यक्ती यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अद्यापपर्यंत केलेल्या कामाबाबतची माहिती या ई-मेल आयडीवर ५ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत पाठवावी. या प्रकल्पासाठी उपजिल्हाधिकारी नितीन विजयकुमार वाघमारे यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचे नियोजनाचे बैठकीत या सामाजिक संस्था, व्यक्ती आमंत्रित करण्यात येईल व कार्यक्रमाची आखणी करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्या 'मैत्री' प्रशिक्षणासाठी १० फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. २४ (जिमाका): केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार यांना राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत 'मैत्री' म्हणून प्रशिक्षण द्यावयाचे आहे. प्रशिक्षीत व्यक्तीची कृत्रिम रेतन व अनुषंगिक कार्य करण्यासाठी नियुक्ती करावयाची आहे. जेणेकरून राज्यातील गायी-म्हशीमध्ये कृत्रिम रेतनाची व्याप्ती वाढेल व ग्रामिण भागातील सुशिक्षीत बेरोजगार यांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच दुग्ध उत्पादनात वाढ होवून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास मदत होईल. या प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांनी १० फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'मैत्री' प्रशिक्षण कार्यक्रम तीन महिने कालावधीचा असून यामध्ये एक महिना क्लासरूम ट्रेनिंग व दोन महिने प्रॅक्टीकल ट्रेनिंगचा समावेश राहील. क्लासरूम ट्रेनिंग पशुवैद्यकीय महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येईल व प्रॅक्टीकल ट्रेनिंग जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -१ किंवा तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय किंवा जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय या ठिकाणी घेण्यात येईल. प्रशिक्षण घेण्यासाठी ईच्छुक हा किमान बारावी उत्तीर्ण झालेला असावा. त्याचे वय १८ ते ३५ वर्षे असावे. अर्जाचा नमुना पशुधनविकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल. लातूर जिल्हासाठी सर्वसाधारण प्रवर्ग व अनुसूचित जाती प्रवर्ग याप्रमाणे एकूण २०० उमेदवारांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल. या योजनांतर्गत इच्छुक उमेदवारांनी २४ जानेवारी, २०२४ ते १० फेब्रुवारी, २०२४ पर्यंत आपल्या तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती यांचेकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे.

# महाडीबीटी पोर्टलवर 'गिव्ह इट अप सबसिडी' पर्याय निवडल्यास शिष्यवृत्ती नाकारली जाणार

लातूर, दि. २४ (जिमाका): जिल्ह्यातील सर्व शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयात सन २०२३-२४ या वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल ११ ऑक्टोंबर, २०२३ पासून सुरु करण्यात आलेले आहे. या पोर्टलवरील 'गिव्ह इट अप सबसिडी' पर्याय (ऑप्शन) स्वीकारल्यास विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती नाकारली जाणार आहे. त्यामुळे ८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संबंधित महाविद्यालयांत राबविण्यात येणार अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्कांची मंजूरी, विद्यापिठांमार्फत दिल जाणारी इतर शुल्काची मंजूरी व शैक्षणिक विभाग किंवा शासकीय यंत्रणा यांच्याकडून घेण्यात येणारी मंजूरी या सर्व बाबींची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधित लिपीक कर्मचारी यांच्यावर आहे. त्यामुळे महाविद्यालयामध्ये समान संधी क्रेंद्र स्थापन करून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जाबाबतच्या अडचणी सोडवाव्यात. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिरे करावी आणि निर्धारित वेळेत शिष्यवृत्ती अर्ज नोंदणी पूर्ण करावी. विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवरील 'गिव्ह इट अप सबसिडी' या ऑप्शनवर क्लिक केल्यास त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती नको आहे, गृहीत धरुन शिष्यवृत्ती नाकारली जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांकनी गिव्ह इट अप सबसिडी' या ऑप्शनवर कोणत्याही परिस्थितीत क्लिक करु नये. सर्व प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज अचूक भरुन मंजूरीसाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयास विहीत मुदतीत ऑनलाईन सादर करावे. महाविद्यालय स्तरावर अथवा विद्यार्थी लॉगीनवर अर्ज प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी आर्थिक जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील, याची सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व व्यवस्थापनांनी नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी केले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर यापूर्वी आधार संलग्नित युजर आयडी तयार करुन अर्ज भरलेले आहेत, त्यांनी नवीन नॉन आधार युजर आयडी तयार करुन नये. नवीन नॉन आधार युजर आयडीवरुन अर्ज नुतनीकरण केल्यास व एकापेक्षा जास्त युजर आयडी तयार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी व महाविद्यालयांची राहील, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत हरंगुळ बु. जिल्ह्यात प्रथम

लातूर, दि. २४(जिमाका): अटल भूजल योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिकधिक लोकांनी सहभागी व्हावे व सर्वांनी गावातील भूजल व्यवस्था शाश्वत राखण्यासाठी सहभाग नोंदवावा, यासाठी गावा-गावांमध्ये सदृढ स्पर्धा निर्माण होण्यासाठी अटल भूजल योजनेंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सन २०२२-२३ या वर्षासाठी भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. ग्रामपंचायतीने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचा ५० लाख रुपयांचा पुरस्कार पटकाविला आहे. भूजलाच्या अनियंत्रीत उपशामुळे भूजल पातळीत होत असलेली घसरण व बाधित होत असलेली गुणवत्ता थांबविण्यासाठी मागणी व पुरवठा व्यवस्थापन प्रणालीच्या प्रभावी अमंलबजावणीद्वारे सहभागीय भूजल व्यवस्थापन, अधिकाधिक सशक्त करण्यासाठी केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यीत अटल भूजल योजना राज्यातील १३ जिल्हयातील ४३ तालूक्यामधील १ हजार १३३ ग्रामपंचायतींमध्ये सुरू आहे. लोकसहभागातून भजल व्यवस्थापन करणे हा योजनेचा गाभा आहे. यासाठी ग्रामस्तरावर जल अंदाजपत्रक तयार करणे, भूजल उपलब्धतेतील तूट भरून काढण्यासाठी अस्तित्वातील राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचे अधिकाधिक अभिसरण करणे, ग्रामस्तरावरील भूजल उपलब्धतेत शाश्वतता साध्य करणे, हे योजनेचे उदीष्ट आहे. लातूर जिल्ह्यातील अटल भूजल योजनेंतर्गत समाविष्ट ११५ ग्रामपंचायतीपैकी ३५ ग्रामपंचायतींनी सन-२०२२-२३ मध्ये भूजल समृध्द ग्राम स्पर्धेत सहभाग घेतलेला होता. या स्पर्धेचे मूल्यांकन उपविभागस्तर, जिल्हास्तर व राज्यस्तर या तीन स्तरावर करण्यात आले. यामध्ये लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांकाचा ५० लाख रुपयांचा पुरस्कार पटकाविला आहे. निलंगा तालुक्यातील जाजनूर ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांकाचा ३० लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे, तर चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ ग्रामपंचायतीला २० लाख रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

# शेवग्याच्या शेंगाचे पाणी प्यायल्यानं रक्तातील साखर कमी होते? मधुमेहींसाठी खरंच ठरते वरदान? तज्ज्ञांकडून जाणून घ्या..

आपला देश फळं, भाज्या यांच्याबाबतीत खूप समृद्ध आहे. निरोगी राहण्यासाठी आहारात नैसर्गिक गोष्टींचा अधिक वापर करावा. अनेक फळे, भाज्या, मसाले आणि औषधी वनस्पती आरोग्यासाठी खूप चांगले असतात; ज्यात शेवग्याच्या शेंगांचादेखील समावेश आहे. अनेकजण शेवग्याच्या शेंगांची भाजी खातात. शेवगा आरोग्यासाठी अमृत मानला जातो. शेवग्याच्या शेंगाचा उपयोग अधिकतर दक्षिण भारतीय पदार्थांमध्ये केला जातो. शेवग्याच्या झाडाच्या प्रत्येक भागात भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट्स आणि पोषक घटक असल्याने त्याझाडाची पाने, फुले, मुळ आणि झाडावर येणाऱ्या शेंगा इत्यादी सर्वांचा खाण्यामध्ये समावेश केला जातो. शेवग्याची पाने, ज्याला ड्रमस्टिक पाने म्हणून ओळखली जातात. शेवग्याच्या शेंगा या अनेक फायदेशीर तत्वांचा भांडार आहे. कारण यात भरपूर प्रमाणात प्रोटीन,अमीनो ॲसिड, बीटा कॅरटीन, कॅल्शिअम, फायबर, सोडिअम आणि वेगवेगळे फीनॉलिक असतात. शेवग्याच्या केवळ शेंगाच नाही तर याच्या पानांचा देखील भाजीसाठी वापर केला जातो. शेवग्याच्या शेंगा आणि शेवग्याची पाने ही अतिशय आरोग्यासाठी फायदेशीर मानली जातात. शेवग्याला ड्रमस्टिक असे संबोधले जाते.घरातील लाल मुंग्या घालवण्यासाठी अतिशय उपयुक्त असे ४ घरगुती उपाय; पुन्हा एकही मुंगी दिसणार नाही ड्रमस्टिकच्या उच्च पौष्टिक मूल्यामुळेच ते सुपरफूड मानले गेले आहे. नाश्ता करताना ड्रमस्टिक किंवा शेवग्याचे पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. हे पेय जेवणासोबत किंवा नंतर घेतल्यास ते पचनास मदत करते, असे मानले जाते. ड्रमस्टिक किंवा शेवग्याचे पाणी सुपरफूड का मानले जाते, शेवग्याच्या शेंगाचे पाणी प्यायल्यानं रक्तातील साखर कमी होते का, याच विषयावर हैदराबाद येथील पोषणतज्ज्ञ डॉ. रोहिणी पाटील यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.डॉ. रोहिणी पाटील सांगतात, शेवग्याचे पाणी हे आवश्यक पोषक तत्वांचा खजिना आहे. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ई, पोटॅशियम आणि कॅल्शियम सारख्या खनिजांसह जीवनसत्त्वे यांचे समृद्ध मिश्रण आहे. शेवग्याच्या शेंगांचा वापर अनेक प्रकारच्या आजारांवर उपचार करण्यासाठी केला जातो. सर्दी-खोकला, घश्यातील खवखव आणि छातीत कफ झाल्यावर शेवग्याचा वापर करणे फायदेशीर असते. तुम्ही शेवग्याच्या शेंगांची भाजी बनवून किंवा शेंगा उकळून याचा वापर करु शकता. यासोबतच तुम्ही हे पाण्यात चांगल्या प्रकारे उकळून हे पाणी पिऊ शकता, त्यामुळे तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात.शेवग्याच्या शेंगा खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. ड्रमस्टिक सूप संधिवात वेदना कमी करण्यास मदत करते. त्याच्या पानातही अनेक गुणधर्म आढळतात. शेवग्याच्या शेंगा खाल्ल्यामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. शेवग्याच्या विविध घटकांमध्ये (शेंगा, पाने, फुले) मधुमेहामध्ये रक्तातील साखर नियंत्रित करण्यापर्यंतचे अनेक गुणधर्म आहेत. शेवग्याचा वापर मधुमेहाच्या रुग्णांमध्ये वजन कमी करण्यासाठी आणि रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी केला जातो. अनेक अभ्यासांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, ड्रमस्टिकच्या पानांमधील अँटिऑक्सिडेंट क्लोरोजेनिक ॲसिड रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. जर तुम्ही शुगरचे रुग्ण असाल तर चहाऐवजी शेवग्याच्या पानांपासून बनवलेला चहा प्यायला सुरुवात करावी. झटपट वजन कमी करण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी स्नॅक्स म्हणून खा बदाम! संशोधनात सांगितले कारण; जाणून घ्या डॉक्टरांचे मत योगासनामुळे मिळतो संधीवातापासून आराम; जाणून घ्या तज्ज्ञांनी सांगितलेल्या योगासनाच्या खास पद्धती शेवग्याच्या पानांचा रस त्वचेसाठी अँटीसेप्टिक म्हणूनही वापरला जातो. मधुमेहाच्या रुग्णांसाठी शेवग्याची शेंग खूप फायदेशीर ठरते. या शेवग्याच्या शेंगा, साल आणि पानामध्ये मधुमेहाला प्रतिबंधित करणारे गुणधर्म आहेत. याचे नियमित सेवन केल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळते, असेही त्या सांगतात. फक्त शेवग्याच्या शेंगाची ताजी पाने किंवा शेंगाचा पावडर पाण्यात घाला, ते भिजू द्या आणि गाळून घ्या. हा एक हायड्रेटिंग पेय म्हणून त्याचा आनंद घ्या. यामुळे तुमच्या आरोग्याला अनेक फायदे मिळतात, म्हणून शेवग्याचे पाणी सुपरफूड मानले जाते, असेही त्या नमुद करतात.

# एसपी साहेबांचे आदेशाचे उल्लंघन किनवट मांडवी,येथे पोलिसांच्या आशीर्वादाने जुगार,मटका, खुलेआम:

किनवट.ता.प्र.(शेख शौकत) :- जुगा र व मटका खुलेआम चालत असून या गोरगरिबांचे कष्टकरांची मजुरीचे कमाई येथील लोक जुगार मटक्यात घालत असून परिवारातील मुला बाळासह रस्त्यावर भीक मागण्याची वेळ काही लोकांवर येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मागील कित्येक महिन्यापासून मांडवी परिसरातील तेलंगणा महाराष्ट्र सीमारेषेवर असलेल्या मांडवी, पिंपळगाव फाटा,येथे पोलिसांच्या आशीर्वादाने एक मोठा परिसरातील शेडमध्ये क्लब जुगार खेळ खुलेआम चालत आहे येथे गोरगरीब आपल्या मजुरी कष्टाची संपूर्ण कमाई रक्कम जुगारात संपवून आपल्या मुलाबाळासह परिवारावर उपासमारीची वेळ येत आहे.
 याबाबत मांडवी पोलिसांना उपोषणाचे निवेदन देऊन सुद्धा डोळे झाक का होते हा एक गंभीर प्रश्न उपस्थित होताना दिसत असून तेलंगाना महाराष्ट्र सीमारेषावर हा अवैध धंद्याचा बाजार चालत असल्याने एखादे मोठे अनुचित प्रकार घडल्यास यास जबाबदार कोण हा देखील एक गंभीर प्रश्न किनवट तालुक्यातील जनतेसमोर उभा आहे मांडवी, पिंपळगाव फाट्यावर चालत असल्याने क्लब मटक्याचा परिणाम परिवारावर होत असल्याने पिढ्या नष्ट होणार व चोरिया गुंडगिरी अशा अवैध मार्गाला लागणार याला जबाबदार पोलिसांची आशीर्वाद असून क्लब मटका तात्काळ बंद न झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाचा इशारा दिला असून यावर पोलिसांची निष्कामियंत्रण काय करेल याकडे जनतेचे लक्ष लागले आहे मांडवी, पिंपळगाव फाटा येथे पोलिसांच्या आशीर्वादाने जुगार ,मटका खुलेआम चालत असून या गोरगरिबांचे कष्टकरांची मजुरीचे कमाई येथील लोक कलब मटक्यात घालत असून परिवारातील मुला बाळासह रस्त्यावर भीक मागण्याची वेळ काही लोकांवर येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मागील कित्येक महिन्यापासून मांडवी परिसरातील तेलंगणा महाराष्ट्र सीमारेषेवर असलेल्या मंडवी व पिंपळगाव फाटा येथे





पोलिसांच्या आशीर्वादाने एक मोठा परिसरातील शेडमध्ये क्लब जुगार खेळ खुलेआम चालत आहे येथे

गोरगरीब आपल्या मजुरी कष्टाची संपूर्ण कमाई रक्कम जुगारात संपवून आपल्या मुलाबाळासह परिवारावर उपासमारीची वेळ येत आहे.
 याबाबत मांडवी पोलिसांना उपोषणाचे निवेदन देऊन सुद्धा डोळे झाक का होते हा एक गंभीर प्रश्न उपस्थित होताना दिसत असून तेलंगाना महाराष्ट्र सीमारेषावर हा अवैध धंद्याचा बाजार चालत असल्याने एखादे मोठे अनुचित प्रकार घडल्यास यास जबाबदार कोण हा देखील एक गंभीर प्रश्न किनवट तालुक्यातील जनतेसमोर उभा आहे मांडवी पिंपळगाव फाट्यावर चालत असल्याने जुगार व मटक्याचा परिणाम परिवारावर होत असल्याने पिढ्या नष्ट होणार व चोरिया गुंडगिरी अशा अवैध मार्गाला लागणार याला जबाबदार पोलिसांची आशीर्वाद असून क्लब मटका तात्काळ बंद न झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाचा इशारा दिला असून यावर पोलिसांची निष्कामियंत्रण काय करेल याकडे जनतेचे लक्ष लागले आहे

# कांदिवलीतील दामू नगर पोयसर नदीवरील पादचारी पुल धोकादायक अवस्थेत. नागरिकांची जीव मुठीत धरून ये -जा.



मुंबई/ शहामत शेख कांदिवली पूर्वेकडील दामुनगर पोईसर नदीवर असलेला पादचारी पुल मोडकळीस येऊन धोकादायक झाला आहे.मात्र महानगरपालिकेने त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी किंवा नवीन पुल उभारण्याची मागणी जनतेतून होत आहे. दामू नगर हा बहुसंख्य दाट लोकसंख्या असलेला स्लम विभाग आहे. हा पादचारी पुल लहूगड गौतम नगर या भागास जोडला जातो.या पुलावरून मच्छी मार्केट,बुध्द विहार खाजगी क्लिनिक,शाळा लोखंडवाला रस्ता, असंख्य नागरिक,विद्यार्थी, महिला ये -जा करतात. या पुलाचे पत्रे पावसामुळे जीर्ण अवस्थेत होऊन धोकादायक झाल्याने कधीही कोसळू शकतो. अशी अवस्था असताना देखील नागरिक आपला जीव मुठीत धरून ये-जा करतात. तसेच नदी लगतचे लोखंडी सुरक्षा रोलिंग दुरावस्था झाल्याने नदीत पडून जीव जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे, एखादा गैरप्रकार झाल्यावरच महापालिकेला जाग येईल असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे. याची सविस्तर तक्रार शिवसेना शाखा समन्वयक (ऊबाठा) वार्ड क्र.२६ चे पठाण चांद शेख यांनी पालिका आर .दक्षिण विभागातील सहाय्यक आयुक्त यांच्याकडे केली आहे अद्याप यावर कसलेही कारवाई झाली नाही.

# शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे धडे मिळावेत बँक अधिकारी उषा सारोळे यांचे मत




लातूर, दि.२४- आर्थिक साक्षरतेसाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे धडे मिळावेत, असे मत जिल्हा बँकेच्या टिळकनगर शाखेतील कनिष्ठ बँक अधिकारी उषा सारोळे यांनी व्यक्त केले.
'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत राजमाता जिजामाता विद्यालयात 'विद्यार्थ्यांमध्ये पैशाचा योग्य विनियोग, बचत बँक' या विषयावर सारोळे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्था सदस्य प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे व बँकेतील कर्मचारी मृणाल रट्टे मंचावर उपस्थित होते.
पैशाचे नियोजन करून गुंतवणूक करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करून यावेळी सारोळे यांनी, बँकेचे व्यवहार, कर्ज, व्याज प्रणाली, आर्थिक व्यवहारासाठी 'युपीआय'सारख्या आधुनिक साधनाचा वापर करताना घ्यावयाची काळजी, इन्स्टंट मोबाइल पेमेंट, फोन पे, गुगल पे, पेटीएम, भीम ॲपबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, राजमाता जिजामाता विद्यालयात बचत बँक स्थापन करणार असून पैशाचा योग्य विनियोग व व्यवस्थापन यात विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. या विभागाचे प्रमुख म्हणून पी. व्ही. कुलकर्णी यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी रट्टे यांनी, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी बँकेत खाते काढावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन सुनीता जवळे यांनी केले तर आभार ए. बी. मुंढे यांनी मानले.

# पंडित जवाहरलाल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा थाटामाटात संपन्न



लातूर :- उदगीर तालुक्यातील तोगरी येथील पंडित जवाहरलाल नेहरु विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात दहावीच्या १९९६ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. प्रथम ग्रामदेवतेचे दर्शन घेऊन ढोलताशाच्या गजरात व लेझीमचे कलागुण दाखवत शिक्षकांची मिरवणूक करण्यात आली. मिरवणूक झाल्यानंतर विद्यालयाच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संतोष गोंदेगावे व महानंदा वीरपाळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापिका इंदुमती येरमाळे व उप प्राचार्य काळगापुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करून आजी-माजी विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज महाजन, मीनाक्षी साकोळे, रुपेश पांचाळ, माणिक कुलकर्णी, अंकुश भताडे, संतोष देवराय, नरसा बिरादार इत्यादी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिवकुमार तोंडारे यांनी केले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने झाली. यावेळी आजी माजी विद्यार्थी शिक्षक वृंद व कर्मचारी तसेच या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उल्हासनगरात राममंदिर प्राण प्रतिष्ठा स्थापना उत्सवा दरम्यान एका परिवारावर जीवघेणा हल्ला

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर कँप १ येथील शितला माता मंदिराजवळ राम मंदिर प्राण प्रतिष्ठा उत्सव साजरा होत असतानांच अग्रवाल परिवारावर काही जणानी हल्ला केला आहे. या हल्ल्यात प्रमोद अग्रवाल व मुकेश अग्रवाल गंभीररित्या जखमी झाले असुन त्याना येथील मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. या हल्ल्या प्रकरणी दिनकर फुंदे व ज्योती फुंदे या पती पत्निला उल्हासनगर पोलिसानी अटक केली असुन चार जण फरार झाले आहेत.
 उल्हासनगर कँप १ म्हारळ नाका येथे असलेल्या शितला माता मंदिरा जवळ २२ जानेवारी रोजी राम जन्मभूमी मंदिर प्राण प्रतिष्ठा उत्सव प्रमोद अग्रवाल व त्यांचा परिवार साजरा करत असतानांच त्यांच्या शेजारी असलेले दिनकर फुंदे व त्यांचे नातेवाईक यांनी तलवार, चॉपर या धारदार हत्यारानी जीवघेणा हल्ला केला .हा हल्ला पुर्ववैमनस्यातुन झाला असुन या पुर्वी दिनकर फुंदे वर हल्ला करणारे लक्ष्मण पाटील याला प्रमोद अग्रवालने न्यायालयात जामीन देवुन सोडवले होते. हा राग दिनकर फुंदे व त्यांच्या नातेवाईकाना होता. म्हणुन फुंदे व त्यांच्या पत्निसह नातेवाईकानी प्रमोद अग्रवाल व त्यांच्या परिवारावर तलवार, चॉपर व रॉड ने जीवघेणा हल्ला केला .या हल्ल्यात प्रमोद अग्रवाल व मुकेश अग्रवाल हे गंभीर जखमी झाले असुन त्यांना उपचारासाठी मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले आहे. या हल्ल्या प्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन पोलिसानी दिनकर फुंदे व त्यांची पत्नी ज्योती फुंदे यांना अटक केली आहे. तर अन्य ४ जण फरार झाले आहेत. दरम्यान दिनकर फुंदे यांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची असुन त्यांच्यावर विविध पोलिस ठाण्यात ८ गुन्हे दाखल आहेत .

# उल्हासनगर विधानसभेची निवडणुक लढवणार , ओमी कलानीचा गर्भित इशारा

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर चे माजी आमदार पप्पु कलानी यांचे सुपूत्र ओमी कलानी यांनी विधानसभेची निवडणुक लढवणार असल्याचा गर्भित इशारा दिला असुन ते कोणत्या पक्षा कडुन निवडणुक लढवणार हे मात्र नक्की नसल्याने त्यांच्या या इशाऱ्यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. मात्र त्यांनी डॉ श्रीकांत शिंदे यांना लोकसभेच्या निवडणुकीत मदत करण्याचे आश्वासन दिले असुन शिंदे यांच्याच पाठबळाने कलानी विधानसभा लढवणार असल्याची चर्चा सुरु आहे. दरम्यान पप्पु कलाने हे राजकिय क्षेत्रापासुन फार दुर असुन जो ही राजकिय निर्णय असेल तो मीच घेतो असे वक्तयव्य करुन एका पुत्राने बापाला आव्हान दिले आहे. उल्हासनगर चे माजी आमदार पप्पु कलानी हे तुरुंगात असताना त्यांचे पुत्र ओमी कलानी यांनी टीम ओमी कालानी ही संघटना तयार करुन शहरातील वातावरण ढवळुन काढले होते. तर भाजपात जावुन २२ नगरसेवक निवडुन आणले होते. दरम्यान भाजपाच्या मदतीने महापौर पद सुध्दा मिळवले होते . आता पप्पु कलानी हे बाहेर असुन सध्या ते शहरात सक्रिय आहेत. मात्र त्यांचाच मुलगा ओमी कलानी यांनी पप्पु कलानी यांना आव्हान देवुन आगामी विधानसभा निवडणुक लढवणार असल्याचे वक्तयव्य केले असुन ही निवडणुक जिंकणार असल्याचे भाकित केले आहे.
 दरम्यान कल्याण लोकसभेच्या निवडणुकीत खा . डॉ श्रीकांत शिंदे यांना मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. पप्पु कलानी हे राजकिय क्षेत्रापासुन फार दुर असुन जे ही राजकिय निर्णय आहेत ते मीच घेतो असे वक्तयव्य करुन पप्पु कलानी यांच्या राजकिय कारकिर्दीवर संशय व्यक्त करुन ते कोणत्याही राजकिय नेत्याला किंवा खासदाराना भेटतात तो एक योगायोग समजावा अशी प्रतिक्रिया देवुन शहरात खळबळ उडुन दिली आहे. दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार किंवा अजित पवार यांच्या गटात नसुन टीम ओमी कालानी हे संघटन स्वतंत्र्य पणे काम करत असल्याचे सांगितले.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि. २४(जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे गुरुवार, २५ जानेवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ना. बनसोडे यांचे २५ जानेवारी रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थान येथे राखीव. सकाळी ११ वाजता आर्वी लातूर येथील शारदासदन अनुसूचित जाती प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा येथे ओपन जिम, पोल्ट्री फार्म व मुलींच्या वसतिगृह इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. सोयीनुसार शकुंतला निवासस्थानकडे प्रयाण व राखीव.

# उल्हासनगर महापालिकेने खोदलेल्या खड्ड्यात पडुन लहान मुलगा जखमी

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर महापालिकेने चेंबर टाकन्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडुन एक लहान मुलगा जखमी झाला आहे. महापालिकेने अमृत . २ योजने अंतर्गत भुयारी गटारी व पाण्याच्या जलवाहीनी टाकन्याचे काम सुरु केले आहे . त्यामुळे ठेकेदाराने सर्वत्र रस्ते खोदुन ठेवले आहेत. या कडे महापालिकेचे कोणते ही लक्ष नसल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. उल्हासनगर शहरात महापालिकेने अमृत .. २ अंतर्गत भुयारी गटारी व जलवाहीनी टाकन्यासाठी रस्ते खोदून ठेवले आहे . दरम्यान उल्हासनगर कँप ४ येथील दहाचाळ रोड वर, रमेश किराणा व गुजर यांच्या चक्की समोर गेल्या एक आठवड्या पूर्वी रस्ता खोदुन ठेवला आहे. तर रस्ता खोदल्यामुळे दगड लागला असे कारण सांगून काम बंद केले आहे. ते काम बंद असतानाच काल परत त्याच ठिकाणी पुन्हा खोदून ठेवले असुन त्या खड्ड्यात एक लहान मुलगा पडला आहे. त्यामुळे त्या मुलाला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली. या खोदलेल्या खड्ड्यामुळे आणि कंत्राटदाराच्या दिरंगाई मुळे नागरिकांचे हाल होत आहेत.दरम्यान शाळकरी मुलाना सुध्दा या खड्ड्यांचा त्रास होत आहे. या खड्ड्याबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांना संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले सहकार्य करा , असे सुचवले आहे. मात्र अजुन किती दिवस सहकार्य करत राहायचं आणि त्रास सहन करायचा, असा प्रश्न बहुजन समाज पक्षाच्या शहर अध्यक्षा निवेदिता जाधव यांनी लेंगरेकर यांना विचारला आहे.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते भारतीय प्रजासत्ताक दिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण

लातूर, दि. २४ (जिमाका): भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार, २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभासाठी १५ मिनिटे अगोदर समारंभाच्या ठिकाणी आसनस्थ होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा मुख्यालयातील सर्व कार्यालये व शैक्षणिक संस्थांनी त्यांचे ध्वजारोहण कार्यक्रम सकाळी ८.३० पूर्वी किंवा सकाळी १० नंतरच आयोजित करावेत, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE